!! श्री !!

शिवसेना

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३ ० ०/२७/०४/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# एम. आय. डी. सी. ने. कामगार वस्तांना मुलभूत सुविधा द्यावी. खासदार चंद्रकांत खैरे यांची अधिकाऱ्यांना सुचना

## ग्रामीण रुग्णालये, क्रिडा संकुल, उद्योक वाचनाल्यांना जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी

**संभाजीनगर : (ता.२७)** औद्योगीकरणांची वाढती व्याप्ती लक्षात घेऊन औद्योगिकरण विकास महामंडळाने कारखाने, कंपन्या लगतच्या भागात कामगार वसाहती स्थापन केल्या. वाढती कामगार संस्था व मुलभूत सुविधांची गरज लक्षात घेऊन त्यासाठी उपाय योजना व जागा उपलब्ध करुन एम. आय. डी. सी. ने कामगारांचे व सामाजिक भान ठेवण्याची सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी सुभेदारी विश्रामगृह येथे बैठकित केली. या बैठकित औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी अण्णासाहेब शिंदे, कार्यकारी अभियंता गावंडे, परळीकर, कारान्ने, हनुमंत बोंडवे, सुनिल काळे, श्रीकृष्ण भोळे, ग्रामविकास अधिकारी संजय मुरादे, शिवाजी बनकर आदिंची उपस्थिती होती.

वडगाव कोल्हाटी, बजाजनगर हा भाग जवळपास ७० ते ८० हजार लोकसंख्येचा भाग असुन या भागात कामगारांचे आरोग्य सुरक्षित राहण्यासाठी रुग्णालये, शेतकऱ्यांसाठी भाजीपाला मार्केट, विद्यार्थ्यांसाठी क्रिडागंण, वाचनालय, अंगणवाड्या, व्यायाम शाळा, महिला पुरुषांसाठी शौचालये आदि मुलभूत सोई सुविधांची अत्यंत गरज आहे. यासाठी एम. आय. डी. सी. कडून रिकामे भुखंड उपलब्ध करुन द्यावेत. यावेळी प्रादेशिक अधिकारी अण्णासाहेब शिंदे यांनी यासाठी यापुर्वी बऱ्याच ठिकाणी जागा देण्याचा आमचा मानस आहे. वाढती गरज लक्षात घेऊन नक्की विचार करु असा विश्वास दर्शविला. शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी ही आपल्या वतीने ग्रामपंचायतीला कचरा कुंडी देण्याचे मान्य केले.

प्रसिध्दी प्रमुख
गणेश वाघ.

फोटो मेल केला आहे.

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com    ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329    8484066606/9604384400